अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.अतिमआ(ज)/ ८७६७
दिनांक - ११/११/2020.

## - कार्यालयीन परिपत्रक -

विषय : कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने कार्यवाही अहवाल सादर करणेबाबत.

पुणे शहरामध्ये कोव्हिड-१९ विषाणूचा वाढता प्रसार आटोक्यात यावा यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना महानगरपालिका प्रशासनाकडून युद्ध पातळीवर राबविण्यात आलेल्या आहेत. सदर विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणेत येत असताना माहे मार्च २०२० ते आज अखेर खात्यामार्फत करणेत आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

सदर आढावा घेणेसाठी सर्व खात्यांमार्फत कोरोनाबाबत केलेल्या कामांचा अहवाल मागविणेबाबत मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) यांनी मला आदेशित केले आहे. तरी सर्व खातेप्रमुख यांनी कोरोना प्रतिबंधासाठी आजअखेर करणेत आलेल्या उपाययोजना तसेच कोण-कोणती कामे केलेली आहेत, ~~तसेच~~ सदर कामासाठी कोणते कोणते स्वरूपाच्या किती निविदा काढण्यात आलेल्या आहेत याचे तपशीलासह सर्व समावेशक माहिती सॉफ्ट कॉपी addmcgoffice@punecorporatin.org या ईमेलवर तसेच हार्ड कॉपी या कार्यालयास दि.१७.११.२०२० रोजी ०४.०० वा. अखेर सादर करावी ही विनंती.

'मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे
आदेशानुसार'

( संदीप खलाटे )
प्रशासन अधिकारी
अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रतिलिपी :

मा.महापालिका आयुक्त
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि/इ)
यांजकडेस माहितीसाठी....

प्रत :

मा.उप आयुक्त (परि.क्र.१ ते ५)
सर्व महा.सहा.आयुक्त
सर्व खातेप्रमुख
यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी...